# सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद धाराशिव

Email-dyceo.gaddharashiv@gmail.com Tel- 02472-223388


वाचा :- 1. या कार्यालयाचे आदेश क्र.जा.क्र. जिपउ/साप्रवि/ने-4/अकंपा/कावि/39/2024 दि. 03.01.2024
2. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.से.यो. प्रकलप लोहारा ता लोहारा यांचे पत्र क्र जा.क्र/एबाविसेयोप्रलो/आ/कावि-154/2024 दि. 02.02.2024
3.या कार्यालयाची नोटीस क्र.जा.क्र. जिपउ/साप्रवि/ने-4/अकंपा/कावि/335/2024 दि. 11.03.2024
4.बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.से.यो. प्रकलप लोहारा ता लोहारा यांचे पत्र क्र जा.क्र एबाविसेयोप्रलो/आ/कावि-230/2025 दि. 10.02.2025

---

जा.क/जिपधा/साप्रवि/ने-4/अंकपा/1320 / 2025
सामान्य प्रशासन विभाग जि.प धाराशिव
दिनांक.18. 8 .2025

**अंतीम नोटीस**

सन 2023 मधील अनुकंपा भरतीच्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. 1 च्या आदेशान्वये आपणास अनुकंपा तत्वावर जिल्हा सेवा वर्ग-4 परिचर या पदावर एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प लोहारा ता.लोहारा जि.धाराशिव येथील रिक्त पदावर पदस्थापना देऊन आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.1 च्या नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे आपण नियुक्ती दिलेल्या ठिकाणी 30 दिवसात उपस्थित होणे आवश्यक असताना आपण अद्याप पर्यंत नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित झालेले नसले बाबतचा अहवाल संदर्भ क्र 2 व 4 अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

संदर्भ क्र.1 च्या नियुकती आदेशातील अट क्र.01 नुसार आपण 30 दिवसाच्या आत कामावर उपस्थित झालेले नसल्यामुळे आपली नेमणुक रद्द का करण्यात येऊ नये याबाबत आपणास संदर्भ क्र. 3 अन्वये नोटीस देण्यात येवुन नोटीस प्राप्त झाले पासुन 7 दिवसाचे आत नियुक्ती दिलेल्या कार्यालयात रुजु व्हाव. आपण मुदतीत रुजु न झाल्यास अथवा आपले लेखी म्हणणे सादर न केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. उक्त नोटीस प्रमाणे आपण नियुक्तीचे ठिकाणी अद्यापही उपस्थित झालेल्या नसुन त्याचा खुलासा ही आपणा मार्फत अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

प्रस्तुत प्रकरणी आपणास या नोटीसद्वारे अंतीम संधी देण्यात येत असुन आपण नियुक्तीचे ठिकाणी 5 दिवसात उपस्थित व्हाव.

आपण उक्त मुदतीत रुजु न झाल्यास अथवा आपले लेखी म्हणने या कार्यालयास सादर न केल्यास आपली ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक अकंपा 100/प्र.क्र. 2820/15 दिनांक.21.07.2000 (आपल्या नियुक्ती आदेशातील अट क्र. 2 मधील तरतुदीनुसार आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल. यापुढे अनुकंपा नियुक्तीबाबत आपणास कोणताही दावा करता येणार नाही. याची गांभिर्याने नोंद घ्यावी .

प्रति,

श्रीमती प्रतिभा रामकृष्ण जगताप
रा. भातागळी ता. लोहारा जि. धाराशिव

Signed by Mainak Ghosh
Date: 14-08-2025 15:27:41

( डॉ. मैनाक घोष भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव